Registered No. B. L.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 27TH MAY 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे मार्च सन १८९७ रोजीं संमति दिली; आणि तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९७ चा आक्ट ६ वा.

#### सन १८८१ चा चेचनी दस्तऐवजांचा आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.

ज्याअर्थीं सन १८८१ चा चेचनी दस्तऐवजांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) ह्या आक्टास, चेचनी दस्तऐवजांचा आक्ट सुधारण्याकरितां सन १८९७ चा आक्ट असें ह्मणावें: आणि — लहान सरनामा व सुरवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सदरहू आक्टाच्या ७२ व्या कलमाच्या आरंभीं, "कलम ८४ ह्यांतील ठराव लागू राहून" हा मजकूर दाखल करावा. — सन १८८१ चा आक्ट २६ वा, कलम ७२, याची सुधारणा.

३. सदरहू आक्टाच्या ८४ व्या कलमाबद्दल खालील कलम दाखल केलें पाहिजे: तें येणेंप्रमाणें:— — सन १८८१ चा आक्ट २६ वा, कलम ८४, ह्याच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

"८४. (१) कोणताही चेक लिहून दिल्यानंतर, तो, ऐवज घेण्याकरितां, वाजवी मुदतीच्या आंत दाखविला नसेल, आणि लिहिणारास किंवा ज्याच्या खातीं तो लिहिला असेल त्या मनुष्यास, तो ज्या वेळीं दाखवावयास पाहिजे होता त्या वेळीं त्या चेकचा ऐवज पेढीवाल्याकडून अदा होण्याचा हक्क होता असें असेल, व तो याप्रमाणें दाखविण्यांत विलंब झाल्यामुळें त्याचें खरोखर नुकसान झालें असेल, तेव्हां तो, अशा नुकसानाच्या यत्तेपर्यंतच्या जबाबदारींतून ह्मणजे, त्या चेकचा ऐवज अदा केला असता — चेक योग्य वेळाच्या आंत दाखविला नाहीं व लिहिणाराला त्यामुळें नुकसान झालें तर.

तर तो त्या पेढीवाल्याचा जेवढ्या रकमेबद्दल धनको असता तिच्याहून जितक्या जास्त रकमेबद्दल तो त्याचा धनको असेल तितक्या रकमेपर्यंतच्या, जबाबदारींतून मुक्त होईल.

(२) वाजवी मुदत कोणती तें ठरवितांना, दस्तऐवजाच्या प्रकाराकडे, व्यापारी व पेढीवाल्यांच्या रिवाजाकडे आणि विवक्षित प्रकरणाच्या हकीकतीकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

(३) सदरहू लिहिणारा किंवा मनुष्य ज्या चेकच्या संबंधानें अशा रीतीनें जबाबदारींतून मुक्त झाला असेल त्या चेकचा धारक, असा लिहिणारा किंवा मनुष्य जितक्या यत्तेपर्यंत मुक्त झालेला असेल, तितक्या यत्तेपर्यंत सदहू पेढीवाल्याचा, त्या लिहिणाराच्या किंवा मनुष्याच्या ऐवजीं धनको होईल, आणि त्याला त्यापासून तो ऐवज वसूल करण्याचा हक्क प्राप्त होईल.

### उदाहरणें.

(अ) अ हा १,००० रुपयांचा एक चेक लिहून देतो, आणि तो चेक दाखवावयास पाहिजे त्यावेळीं पेढीवर त्या चेकचे पैसे देण्यास त्याचे फंड आहेत. तो चेक दाखविण्यापूर्वीं त्या पेढीचें दिवाळें निघतें. अशा बाबतींत सदहू चेक लिहून देणारा जबाबदारींतून मुक्त होतो, परंतु त्या चेकच्या धारकास त्या चेकच्या ऐवजाबद्दलचा आपला हक्क त्या पेढीवर शाबीत करतां येईल.

(ब) अ हा अंबाला मुकामीं कलकत्यांतील एका पेढीवर एक चेक लिहून देतो. तो चेक मामूल क्रमाप्रमाणें दाखविण्यांत येण्यापूर्वीं त्या पेढीचें दिवाळें निघतें. अशा बाबतींत अ हा जबाबदारींतून मुक्त होत नाहीं; कारण तो चेक दाखविण्यात कोणताही विलंब झाल्यामुळें त्याचें खरोखर नुकसान झालेलें नाहीं.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.